अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# तिसरी आघाडी म्हणजे भाजपावरची कुरघोडी

भारतातील राजकीय पक्षांचा प्रवास परिपक्वतेकडे आहे की, अराजकतेकडे आहे? असा प्रश्न निर्माण होतो. जगातल्या अनेक लोकशाहीवादी देशांमध्ये राजकीय स्वार्थापेक्षा देशाच्या विकासाला प्राधान्य देण्याचा कल दिसून येतो. आपल्याकडे मात्र त्याच्याविरुध्द परिस्थिती पाहायला मिळते. स्वार्थासाठी देशाच्या विकासालाही पिळ घालण्याचे प्रयत्न राजकीय पक्षांकडून होत असतात. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. मग अगदी राजकीय पक्षांकडे जमा होणारा निधी निवडणुकीत खर्च होणारा बेसुमार पैसा किंवा भ्रष्टाचार रोखण्यात प्रत्येक राजकीय पक्षाला आलेले अपयश अशा अनेक मुद्द्यांचा त्यात समावेश होऊ शकतो. त्याच्या बरोबरीने विचार करता येणारा दुसरा भाग म्हणजे सत्ता बळकावण्यासाठी निर्माण होणारे भरमसाट राजकीय पक्ष. देशात स्थिर सरकार यावे, जनतेच्या समस्या वेगाने सुटाव्यात, देशाचा विकास व्हावा असा विचारच राजकीय पक्ष करताना दिसत नाहीत. याचे ताजे उदाहरण म्हणजे पुन्हा एकदा नव्याने सुरू झालेला तिसऱ्या आघाडीचा प्रयोग म्हणावा लागेल. निवडणुका तोंडावर आल्या असताना अचानकपणे या दुसऱ्या आघाडीच्या मोर्चेबांधणीला तोंड फुटावे याचा अर्थ काय? त्यामागे देशाच्या राजकीय स्थिरतेऐवजी राजकीय स्वार्थाचा हेतू स्पष्टपणे दिसतो. सध्याच्या वातावरणात काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी या दोघांमध्ये आगामी लोकसभा निवडणुकीत जोरदार स्पर्धा होईल असे चित्र निर्माण झाले होते. परंतु आता दुसऱ्या आघाडीने उडी घेतल्यामुळे बराच फरक पडणार आहे. या तिसऱ्या आघाडीच्या निर्मितीमागे काँग्रेसची फूस असल्याची तितकीच जोरदार चर्चा सुरू झाली आहे. यावरून ही तिसरी आघाडी म्हणजे भारतीय जनता पार्टीवरची राजकीय कुरघोडी आहे हे सिध्द होते. भाजपा आणि काँग्रेस यांचे येणाऱ्या निवडणुकीमध्ये काय भवितव्य राहील याचे अंदाज वर्तवणारी सर्वेक्षणे प्रसिध्द झाली आहेत. त्यामध्ये अनेक राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टीची परिस्थिती खूपच चांगली असल्याचे आढळून आल्यामुळे भाजपा विरोधकांची बऱ्यापैकी घाबरगुंडी उडाली आणि मग भाजपाच्या या प्रसाराला रोखण्याकरिता काहीतरी उपाय करणे गरजेचे होते. त्यातला एक उपाय परस्परच मार्गी लागल्यामुळे भाजपा विरोधक खूश होते. दिल्लीत आम आदमी पार्टीचा प्रभाव असल्यामुळे तिथे भाजपाच्या आपोआपच तीन ते चार जागा कमी झाल्याचे मानले जात आहे.

## काँग्रेसची फूस

हाच फॉर्म्यूला देशभर राबवता आला तर भाजपाच्या वाटेत सहजपणे काही काटे निर्माण करता येतील, असे वाटल्यामुळे आजच्या प्रवाहातून पुन्हा एकदा तिसऱ्या आघाडीच्या कल्पनेचा जन्म झाला. या तिसऱ्या आघाडीत कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पार्टी, द्रमुक, तेलगू देसम, जनता दल यासारखे पक्ष एकत्र आले आहेत. या प्रत्येक पक्षाचा अनेक मतदारसंघांवर स्वतंत्रपणे प्रभाव आहे. त्याची संख्या नगण्य जरी असली तरी भाजपाला मिळणाऱ्या मतांची फाटाफुट करण्याइतकी शक्ती त्या मतांमध्ये निश्चितच आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आमच्या प्रभावामुळे भाजपा आपोआप रोखली गेली. राष्ट्रीय पातळीवर भाजपाला रोखायचे असेल किंवा भाजपाच्या अपेक्षित विजयी संख्येला छेद द्यायचा असेल तर, तिसऱ्या आघाडीला प्रोत्साहन द्यायचे अशी चाणाक्ष खेळी काँग्रेस खेळू शकते. आम आदमी पार्टीचा जीव अजून छोटा असल्यामुळे तिचा देशभर वापर करून घेता येणार नाही. त्यापेक्षा तिसऱ्या आघाडीचे प्यादे पुढे सरकवणे सहज सोपे आहे. त्यातून पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपाच्या वजिर ए आलमना या प्याद्यामार्फत चेकमेट देता येऊ शकतो. आता देशभरामध्ये ज्या पध्दतीचे वातावरण निर्माण झाले आहे की, ते पाहिल्यावर भाजपाच्या मतांची जितकी जास्त फाटाफुट करता येईल. तितकी करण्याचा राजकीय डाव काँग्रेस आणि तिसरी आघाडी खेळणार आहे हे लक्षात आल्यामुळेच नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधल्या जाहीर सभांमध्ये तिसरी आघाडी म्हणजे, देशाची बिघाडी असल्याची जळजळीत टीका केली होती. कारण मोदी यांना आता आपला पंतप्रधानपदाचा मार्ग कोणीही रोखू शकत नाही, असे वाटायला लागले होते. तो निर्वेध आहे अशी त्यांची समजूत झाली असतानाच, तिसऱ्या आघाडीला मुसंडी मारण्याकरिता काँग्रेसने प्रोत्साहन दिल्याचे स्पष्ट झाले. ही सरळसरळ भाजपावरची राजकीय कुरघोडी ठरते. कारण अनेक राज्यांमध्ये आपल्या जागा वाढाव्यात यासाठी भाजपाने फार समजून उमजून प्रयत्न सुरू केले. उत्तर प्रदेशात कल्याण सिंग यांच्याबरोबरीने उमा भारतींना तिथे पाठवले गेले. कर्नाटकात येदू युरप्पांना पुन्हा पक्षात प्रवेश देऊन भ्रष्टाचाराशीच समझोता करण्याची पाळी भाजपावर आली आणि त्याच ठिकाणी देवेगोडांच्या नेतृत्वाखाली तिसरी आघाडी निवडणुकीत उतरली तर भाजपाच्या अनेक जागांना धक्का लागू शकतो.

## महाराष्ट्रातही प्रभाव असेल

गेल्या पाच निवडणुकांमध्ये कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नाही किंवा एकाच पक्षाच्या हाती निर्विवादपणे सत्ता गेलेली नाही. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीतही तिसऱ्या आघाडीमुळे तेच चित्र कायम राहणार आहे. म्हणजेच भारताच्या लोकशाही प्रक्रियेत एक स्थिर सरकार हा विषयच इतिहासजमा होणार आहे. प्रादेशिक पातळीवरचे छोटे पक्ष आणि केंद्रात एकाच पक्षाच्या हाती सत्ता अशीच परिस्थिती भविष्यकाळातही कायम राहील. अगदी आपल्या महाराष्ट्राचा जरी विचार केला तरी शिवसेना, मनसे यांचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येते. भारतीय जनता पार्टीला त्यांना बरोबर घेऊनच महायुतीचा महाखेळ खेळावा लागतो. यावेळेला आम आदमी पार्टीच्या प्रसारामुळे महाराष्ट्रातसुध्दा भाजपाच्या काही जागांना धक्का लागू शकतो. महाराष्ट्र हा तसा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. त्याला तडा जाऊ नये म्हणूनच तिसऱ्या आघाडीचा उपयोग होऊ शकेल. या उद्देशानेच तिसऱ्या आघाडीचे नेतेदेखील उत्साहात आहेत. भलेही सत्ता मिळाली नाही तरी चालेल, पण भाजपाला रोखता आले याचे त्यांना बरेच समाधान वाटत आहे. तिसऱ्या आघाडीची फारशी शक्यता दिसत नव्हती आणि भाजपाला मिळणारा प्रतिसाद वाढतो आहे हे पाहूनच शरद पवारांनीसुध्दा मोदींच्या बाजूचे विधान करून स्वत:साठी एक स्पेस किंवा व्यवस्था निर्माण करून ठेवली होती. मात्र या नव्या राजकीय कुरघोडीमुळे लोकसभा निवडणुकीतल्या काही समीकरणांवर निश्चितच परिणाम होऊ शकतो.